# CFLDs on Oilseeds and Pulses



Seed distribution




Input distribution



Farmer Training



Field visit



Demonstration of Linseed



लोकमत

कोरपअल्ली येथे कार्यक्रम : कृषी विज्ञान केंद्राच्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन

**कीड व्यवस्थापनाचे धडे**

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुलचेरा :** तालुक्यातील कोरपअल्ली चेक येथे राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत सोमवारी शेतकरी प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणात हरभरा पिकावरील घाटेअळी निर्मूलनाबाबत कृषी विज्ञान केंद्राच्या तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषतज्ज्ञ (पीक संरक्षण) पुष्पक बोथीकर, विषय विशेषतज्ज्ञ (कृषी अभियांत्रिकी) ज्ञानेश्वर ताथोड, आत्माचे आकाश लव्हाटे उपस्थित होते. एकात्मिक पद्धतीने हरभरा पिकावर येणारी मुख्य कीड घाटेअळीबाबत शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती करण्याच्या दृष्टीने सदर प्रशिक्षण घेण्यात आले.

कोरपअल्ली येथे हरभऱ्याची पाहणी करताना कृषी विज्ञान केंद्राचे विषयतज्ज्ञ

पुष्पक बोथीकर यांनी हरभरा पिकावरील कीड व रोगाचे एकात्मिक पद्धतीने व्यवस्थापन करण्याबाबत मार्गदर्शन केले. ज्ञानेश्वर ताथोड यांनी हरभऱ्यातील तण नियंत्रण यंत्राद्वारे कापणी करण्याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी हरभरा पिकावर येणाऱ्या रोग व किडीविषयी शेतकऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्याशी संवाद साधण्यात आला.

**तुरीवर किडीचा प्रादुर्भाव**

- तूर पिकावर शेंगा पोखरणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव झाला आहे. त्यामुळे यंदाही तुरीच्या उत्पादनात घट येण्याची शक्यता आहे. कीड व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

Hello Gadchiroli
Page No. 3 Jan 22, 2019
Powered by: erelego.com

News Coverage